# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**हातकणंगले (जि.कोल्हपूर) तालुक्याचे विभाजन करुन इचलकरंजी हा स्वतंत्र तालुका निर्मिती करणेबाबत**

**(१) १९८६ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठया तालुक्यांचे विभाजन करुन नवे तालुके निर्माण करणेसाठी दि १५ नोव्हेंबर, २००११ च्या शासन परिपत्रकान्वये तालुका विभाजनाचे निकष निश्चित करणेसाठी समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हातकणंगले (जि. कोल्हपूर) तालुक्याचे विभाजन करुन इचलकरंजी हा स्वतंत्र तालुका निर्मिती करणेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्या अनुषंगाने हातकणंगले तालुका विभाजन करुन इचलकंरजी तालुका निर्मितीबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती व समितीचा अहवाल केव्हापर्यत प्राप्त होणार आहे वा प्राप्त झाला आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरिविण्याकरिता दि.१५ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वे गठित करण्यात आलेल्या विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यांवर सविस्तर अभिप्राय देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्याआधारेच राज्यातील तालुक्यांची पुनर्रचना करुन नवीन तालुक्यांच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**कोकणातील उरण ते गोवा भागातील अनेक खाड्यांचा प्राथमिक भाग गाळामुळे भरल्याबाबत**

**(२) २२७६ (२२-१२-२०१४). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील उरण ते गोवा भागातील अनेक खाड्यांचा प्राथमिक भाग गाळाने भरल्यामुळे कोळी मिच्छमारांना मच्छिमारीसाठी खाडीमध्ये बोटी नेता येत नसल्याने त्यांची उपासमार होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील गाळ काढण्यासाठी व मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०५-२०१६) :**(१) नाही, राज्याच्या सागरी किनारपट्टीवर १७३ मासळी उतरविण्याची केंद्रे असून या ठिकाणी विविध योजनांतर्गत मासेमारी जेट्टी व मुलभूत सुविधा पुरविण्याची कामे घेण्यात येतात. या कामाचा भाग म्हणून आवश्यक तेथे गाळ काढण्याचे काम करण्यात येते. तसेच खाडी मुखातील गाळ काढण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत दोन ड्रेझर खरेदी करण्यात आले आहेत.

(२) खाडीतील गाळ साचल्याने मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबतचे प्रावधान नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रात स्वतंत्र तहसिलदार कार्यालय स्थापन करणेबाबत**

**(३) २४७७ (२२-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराच्या निर्मितीस २५ वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटूनही तसेच नवी मुंबई शहराची लोकसंख्या १५ लाखाच्या आसपास असतांनाही अद्यापि नवी मुंबईतील नागरिकांसाठी शहरात स्वतंत्र तहशिलदार कार्यालय उपलब्ध नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील नागरकिांना शासनाच्या विविध योजना जमिनीची प्रकरणे, विविध दाखले, इत्यादी कामांसाठी ठाणे तहशिल कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात, असल्यामुळे नागरीकांना आतोनात त्रास सहन करावा लागत आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबईतील नागरिकांच्या सोयीसाठी नवी मुंबई परिसरात स्वतंत्र तहसिल कार्यालय स्थापन करण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने तसेच नवी मुंबईतील नागरिकांची होत असल्याची गैरसोय विचारात घेऊन नवी मुंबई परिसरात स्वतंत्र तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नवी मुंबई येथील नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता नवी मुंबई येथे ई.सेवा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत सदर ई-सेवा केंद्रांमार्फत विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(३) व (४) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर सविस्तर अभिप्राय देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच राज्यातील तालुक्यांची पुनर्रचना करुन नवी मुंबईसह नवी तालुक्यांच्या पुनर्रचना करुन नवी मुंबईसह नवीन तालुक्यांच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

## गडचिरोली जिल्हयातील अतीदुर्गम, नक्षलग्रस्त, अतीसंवेदनशिल म्हणून चामोर्शी तालुक्याचे विभाजन करुन घोट तालुक्याची निर्मिती करण्याबाबत

**(४) ३४४९ (२२-१२-२०१४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील अतीदुर्गम, नक्षलग्रस्त, अतीसंवेदनशिल म्हणून चामोर्शी तालुक्यातील घोट परिसर ओळखला जात आहे, त्यामुळे या परिसराचा विकास करण्यासाठी चामोर्शी तालुक्याचे विभाजन करुन घोट तालुक्याची निर्मिती करावी अशी मागणी वारंवार लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी केली असल्याची माहिती दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी तालुक्याचे विभाजन करुन घोट तालुक्याची निर्मिती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, घोट तालुक्याची निर्मिती केव्हा होणार आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरिता गठित करण्यात आलेल आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर सविस्तर अभिप्राय देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्याआधारेच राज्यातील तालुक्यांची पुनर्रचना करुन नवीन तालुक्यांच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एम.विश्वश्वरर्या औद्योगिक विकास व संशोधन केंद्रातील पदाधिकाऱ्यांकडून संस्थेचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(५) ७४५८ (०४-०४-२०१५). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे एम.विश्वश्वरर्या औद्योगिक विकास व संशोधन केंद्र (एमव्हीआयआरडीसी) हे १९७८ साली शासनाच्या जागेवर सुरु करण्यात आले असून या ठिकाणी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून शासकीय जागेचा गैरवापर करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांनी अखिल भारतीय औद्योगिक असोशिएशनच्या माध्यमातून एमव्हीआयआरडीसीचे उपक्रम राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासकीय जागेचा गैरवापर करुन शासनाच्या मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असल्याने याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, व चौकशी मध्ये काय आढळून आले व त्या नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) या संदर्भात शासनाकडे तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) व (३) एम.विश्वेश्वरैया इंडस्ट्रियल रिसर्च आणि डेव्लपमेंट सेंटरला वर्ल्ड ट्रेड सेंबर बांधण्यासाठी शासनाने भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेचे भुईभाडे व त्यांच्या उत्पन्नातील ५०% हिस्सा रक्कमेची परगणना करण्यासाठी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१८ मे, २०१५ अन्वये समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शासनाने ज्या अटी व शर्तीवर जमिन प्रदान केली आहे त्या अटी व शर्तीचे पालन सदर संस्था करीत आहे. किंवा कसे, याची तपासणी करणेकामी जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांचे स्तरावर अधिकाऱ्यांची चौकशी समिति नेमली असून, त्यांचेकडून याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यांत प्रॉपर्टीकार्ड ऑनलाईन मिळण्याबाबत.**

**(६) १०९४८ (०४-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच गांवामध्ये आजवर प्रॉपर्टी कार्ड मागितल्यानंतर १०/१२ उतारा दिला जात असे आता नवीन वर्षात सोलापूर हद्दीतील ६ गांवठांणासह जिल्ह्यातील ३०७ गांवामध्ये संगणकीकृत प्रापर्टीकार्ड मिळणार आहे, यामध्ये जिल्ह्यातील २ लाख ९९ हजार ६५७ मिळकतींचा समावेश आहे यातील २० हजार ६०३ शासकीय मिळकती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्वच जिल्ह्यांत प्रॉपर्टीकार्ड ऑनलाईन मिळण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६)** :(१) सोलापूर शहर येथील सर्व मिळकत पत्रिकांचे संगणकीकृत मिळकत पत्रिका उतारे जनतेस पुरविण्या येत असून सोलापूर शहरासह जिल्ह्यातील नगर भूमापन झालेल्या व प्रत्यक्षात परिक्षणाखाली असलेल्या ३०२ गावातील एकूण ३,०१,०७८ मिळकत पत्रिकांचे संगणकीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील एकूण शासकीय मिळकतींची संख्या १९,९२४ इतकी आहे.
(२) व (३) सद्या राज्यातील नगर भूमापन कार्यालयांमध्ये ऑनलाईन प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संगणकीकृत फेरफार प्रणाली विकसित करण्यासाठी प्राथमिक कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

---

**पन्हाळ नगरपरिषद (जि.कोल्हापूर) हद्दीतील जमिन लिज धारकांनी बळकावल्याबाबत**

**(७) १४८१० (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळा नगरपरिषद (जि.कोल्हापूर) येथील काही शासकीय भूखंड सन १९५२ ते १९७४ या कालावधीमध्ये काही परगावाच्या धनिकांना शासनाने लीजवर दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लिलावाच्या कराराप्रमाणे संबंधित लिज धारकांनी भूखंड घेतल्यापासून दोन वर्षाच्या आत निवासी कारणासाठी बांधकाम करणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अटी व शर्तीचा भंग झाल्याने यापैकी काही भूखंड शासनाने परत आपल्या ताब्यात घेतले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर लिज धारकांनी महसूल विभाग व भूमापन कार्यालय येथे खोटी कागदपत्रे सादर करून हे भूखंड आपल्या नावावर पून्हा केलेले आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर लिज भूखंडापैकी काही भूखंडावर वणिज्य (हॉटल्स) वापर सुरू असल्यामूळे, अटी व शर्तीच्या भंग झाला असल्याने, याबाबत संबंधितावर काय कारवाई करण्यात आली आहे,
(६) असल्यास, पन्हाळा नगरपारिषदेच्या मालकीच्या जागा नसल्यामुळे नगरपरिषद अग्नीशमन केंद्र, ॲम्युमेंन्ट पार्क इ.उभारू शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर भूखंड शासन परत घेऊन नागरिकांनच्या व पर्यटकांसाठी मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी पन्हाळा नगरपरिषदेस हे भूखंड हस्तांतर करणार आहे का वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६)** :(१), (२), (३), (४), (५), (६) व (७) सन १९५२ ते १९७४ या कलावधीमध्ये पन्हाळा नगरपरिषद, जि.कोल्हापूर येथील शासकीय भूखंड एकूण ४२ धारकांना शासनाने लीजवर दिलेले आहेत. सदर लिजधारकांनी कराराप्रमाणे संबंधित भूखंड घेतल्यापासून दोन वर्षाच्या आत निवासी कारणासाठी बांधकाम करणे त्यांच्यावर बंधानकारक आहे. परंतु काही लिजधारकांनी त्यांच्या भूखंडावर बांधकाम केलेले नाही. सदर लिजधारकांपैकी ५ लिजधारकांनी करारातील अटी व शर्तीचे भंग केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे भूखंड परत शासनाने ताब्यात घेण्यात आले होते. परंतू अपर जिल्हाधिकारी यांचे आदेशाने सदर भूखंडा परत त्याच लिजधारकांना ताब्यात देण्यात आले आहेत. सदर लिज धारकांनी महसूल विभाग व भूमापन कार्यालय येथे खोटी कागदपत्रे सादर करुन भूखंड आपल्या नावावर केलेले आहेत, असा प्रकार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिसून आलेला नाही.

पन्हाळा शहर विकास योजना (दुसऱ्या सुधारीत) मध्ये अग्निशमन केंद्र व अम्युझमेंट पार्कसाठी कोणतेही आरक्षण दाखवलेले नसून पन्हाळा नगरपरिषदेकडे अग्निशमन केंद्र व अम्युझमेंट पार्कसाठी जागा उपलब्ध नाही.

उपरोक्त प्रकरणी शर्तभंगाबाबत सखोल चौकशीचे निर्देश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना देण्यात आले आहेत.

---

## गुंठेवारी नियमित करण्यासाठी १९४७ चा तुकडा बंदी कायदा कालबाह्य झाल्याने तो शिथिल करण्याबाबत

**(८) १९२४१ (१६-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात सन २०१० पासून तुकडा बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्याने १० गुंठे क्षेत्रापेक्षा कमी जागेच्या खरेदी दस्ताची नोद महसुल दप्तरी ७/१२ वर होत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास दिनांक २१ मे, २०१५ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या एका कर्मचा-याने हवेली तालुक्यातील थेऊर येथे शेती व नाविकास झोन मध्ये गटवारी केलेल्या १० गुठ्यांपेक्षा कमी क्षेत्राची ७/१२ नोंद दप्तरी करुन घेतली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गुंठेवारी नियमित करण्यासाठी १९४७ चा तुकडा बंदी कायदा कालबाह्य झाल्याने तो शिथिल करण्याबाबत महसूलमंत्री महोदयांनी यातून सकारात्मक मार्ग काढू असे आश्वासन जुलै २०१४ मध्ये दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, १९४७ चा तुकडेबंदी कायदा शिथील करुन १० गुंठयाची अट १ गुंठयापर्यंत आणण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आह,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) अशा स्वरुपाची नोंद घेण्यात आली होती. मात्र, मंडळ अधिकारी थेऊर यांनी सदरची नोंद महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम या काद्यातील तरतुदींचा भंग करणारी असल्याने सदरची नोंद रद्द केलेली आहे.

(३), (४) व (५) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २/२०१६ अन्वये "महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम" यात सुधारणा करुन प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजने अंतग्रत निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक इत्यादी अकृषिक स्वरुपाच्या वापर विभागात दर्शविण्यात आलेल्या शेती जमिनींच्या संदर्भात तुकडेबंदी विषयक निर्बंध कमी करण्यात आले आहेत.

---

### पन्हाळा नगरपरिषद (जि.कोल्हापूर) येथील खाजगी मिळकतीवरील 'ब' सत्ता प्रकाराची नोंद कमी करण्याबाबत

**(९) २१८३७ (१०-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा नगरपरिषद (जि.कोल्हापूर) येथील ११३ खाजगी मिळकतीवर 'ब' सत्ता प्रकार आरक्षण नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मिळकती पूर्वी पासुन खाजगी मालकीच्या असल्याबाबतची दप्तरी नोंद भूमी अभिलेख कार्यालय पन्हाळा यांचेकडे आहे, शासनाकडून नजरचुकीने कोणत्याही कागदपत्रांचा आधार नसताना या मिळकतीवर 'ब' सत्ता प्रकाराची नोंद झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नोंदीमुळे मिळकतीची खरेदी-विक्री, बँक तारण कर्ज, बोजा नोंद करण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत सदर मिळकत धारकांनी 'ब' सत्ता प्रकारची नोंद कमी होण्याबाबतचा प्रस्ताव सर्व पुराव्यानिशी उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांचेकडे सन २०१३ मध्ये दाखल केलेला आहे, या प्रस्तावांवर उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मिळकतीवरील 'ब' सत्ता प्रकाराची नोंद शासन तातडीने कमी करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६)** :(१), (२), (३), (४) व (५) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा नगरपरिषदेतील बऱ्याच मिळकतीच्या अधिकार अभिलेखात "ब" सत्ता प्रकार नोंदविला आहे.

एखाद्या व्यक्तीस सदर नोंद सदोष वाटप असल्यास त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतूदीखाली सक्षम प्राधिका-यांकडे पुनरीक्षण अर्ज दाखल करुन दाद मागण्याची मुभा आहे. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पन्हाळा यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या पुनरीक्षण अर्जावर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**परभणी जिल्हयातील झरी येथील वीज वितरणातील तक्रारीकडे महावितरण कंपनीकडून दुर्लक्ष केले जात असल्याबाबत**

**(१०) २२८७६ (०६-०८-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील झरी येथील वीज वितरणातील तक्रारीकडे महावितरण कंपनीकडून दुर्लक्ष केले जात असल्याने ग्राहकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर भ्रमणध्वनीद्वारे तसेच कार्यालय दूरध्वनीवर माहिती दिली जात नसणे, वारंवार खंडित होणाऱ्या वीजेमुळे नागरीक संतप्त होणे, आदि तक्रारीकडे महावितरण कंपनीकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील केसापूर पीठाच्या जमिनीच्या भाड्याच्या रक्कमेमध्ये कोणतीही वाढ झालेली नसल्याबाबत**

**(११) २३२१९ (०६-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील केसापूर पीठाची जागा छत्रपती संभाजी महाराजांनी करवीर पीठाला इनाम दिली असून गेली १४० वर्षे जमिनीच्या भाड्याच्या रक्कमेमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, सदर जागेचे वार्षिक भाडे कमीत कमी २० लाख रुपये करण्याची तसेच पीठाची काही मालमत्ता शासन कार्यासाठी आरक्षित असून त्याचा मोबदला पीठाला देण्याची मागणी करवीर पीठाचे शकराचार्य यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा प्रस्ताव गेली ४ वर्षे महसूल विभागाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व  भाड्याच्या रक्कमेमध्ये वाढ करण्याबाबत शासनाची भूमिका काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :**(१) कोल्हापूर शहरातील केसापूर पेठ हा भाग श्री.स्वामी जगतगुरु शंकराचार्य पीठ करवीर कोल्हापूर यांनी पुर्वी इनाम म्हणून करवीर सरकारने दिलेला होता. सन १८७३ चे सुमारास कोल्हापूर येथे म्युन्सिपालटी स्थापन झाल्याने व त्या म्युन्सिपालटीचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने त्या वेळेच्या मुंबई सरकारने त्यांच्या दिनांक १२.०८.१८७३ च्या निर्णयाचे केसापूर पेठ संपादित केली व म्युन्सिपालटीमध्ये सामील केली.केसापूर पेठ ही देवस्थान इनामातील जमीन असलेने त्याची एक रक्कमी नुकसान भरपाई न देता मुंबई सरकारने प्रतीवर्षी रु. १८६.७०  पैसे (रुपये एकशे शहाऐंशी पैसे सत्तर फक्त) इतकी रक्कम "कॅश अलौन्स" म्हणून करवीर तालुका ट्रेझरी येथून कायमपणे देण्यात यावी. असा हुकुम पोलिटिकल एजंट कोल्हापूर व कर्नाटक यांना दिला होता.
(२) सदर रकमेत वाढ करुन रु. २० लाख प्रतिवर्षी कॅश अलौन्स मिळण्याबाबत करवीर पीठाने मागणी केलेली आहे.
(३), (४) व (५) उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

---

**मौजे तडशिनहाळ (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील सरकारी पाणंद रस्त्याची बेकयदेशीर विक्री करुन ७/१२ वर नोंद करण्यात आल्याबाबत**

**(१२) २३२४७ (०६-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तडशिनहाळ (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ३३ फुट रुंदीच्या सरकारी पाणंद रस्त्याची बेकयदेशीर विक्री करुन त्यांची सातबारापत्रकी नोंद करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून गेली ५ वर्षे विविध संघटना आंदोलन करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी १३/७/२०११ रोजी तहसिलदार चंदगड यांना या प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार सदरची सरकारी जमीन बळकावनाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) मौ.तडशिनहाळ, ता.चंदगड येथील गट नं. १३३/अ, १३४, १३५, १३७, १३९, १४०, १४४ व १४३ मधून बेळगांव वेंगुर्ला रस्त्याला (हायवे) मिळणाऱ्या पाणंद रस्त्याबाबत अतिक्रमण व सरकारी पाणंद रस्त्याची बेकायदेशीर विक्री करुन गानन ७/१२ मध्ये नोंद होत असलेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने स्थळनिरिक्षण करण्यात आले असता स्थळ निरीक्षणानुसार गाव नकाशामध्ये सरकारी पाणंद रस्त्याची नोंद दिसून येते.

सदर रस्त्याबाबतची मोजणी तालुका भूमी अभिलेख, चंदगड यांचेकडून करणेत आली असून सदर मोजणी नकाशानुसार गाव नकाशामध्ये नमूद असलेल्या पाणंद रस्त्यामधील अतिक्रमणे काढूण टाकणेबाबत सर्व सहहिस्सेदार व तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेऊन तहसलिदार चंदगड यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये चौकशी करुन दि.३०/११/२०१५ रोजी आदेश पारीत केले असून त्यात तक्रारदारांची विनंती मंजूर केली आहे.

---

**बावधन भागातून (जि.पुणे) वाहणाऱ्या अन बावधन बुद्रुक व बावधन खुर्द भागातील अतिक्रमणांमुळे राम नदीची मरणासन्न अवस्था झाल्याबाबत**

**(१३) २३६४९ (०६-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावधन भागातून (जि.पुणे) वाहणाऱ्या अन बावधन बुद्रुक व बावधन खुर्द भागातील अतिक्रमणांमुळे राम नदीची दयणीय अवस्था झाली असल्याची तक्रार माहे जून, २०१५ च्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असलयास, या तक्रारीनुसार या भागाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) रामनदी पात्रात महसूल विभागाच्या अखत्यारित असलेली अनधिकृत बांधकामे दि. ३०/०९/२०१५ रोजी काढून टाकण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बावधन बुद्रुक (जि.पुणे) येथील बांधकाम व्यावसायिकांकडून डोंगर पोखारण्यात येत असल्याबाबत**

**(१४) २३६८६ (०६-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावधन बुद्रुक (जि.पुणे) पिण्याच्या पाण्याच्या टाकी भोवती डोंगर बांधकाम व्यावसायिकांकडून डोंगर पोखारण्यात येत असल्याने पाण्याच्या टाकीला धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०१५ च्यासुमरास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणी तेथील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कारवाई केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६)** :(१) व (२) होय अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली होती.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रश्नाधीन भागात सदर बांधकाम व्यावसायिकांस पूर्वी दि. ०१/१२/२०१४ रोजी दिलेली माती उचलण्याची परवानगी तहसिलदार, मुळशी यांनी दि. १२/१२/२०१४ च्या आदेशान्वये रद्द केली आहे. तसेच अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४८(७) अन्वये कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीवर्धन-म्हसळा तालुक्यात रेती उत्खनन बंद असल्यामुळे असख्य मजूरांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(१५) २३७३० (१०-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीवर्धन-म्हसळा तालुक्यात गेल्या एक महिन्यापासून सुरु असलेले रेती उत्खनन बंद असल्यामुळे दोन्ही तालुक्यात पुर्णपणे रेती व्यवसाय बंद असल्यामुळे सर्व कामे ठप्प पडली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रेती उपसा बद असल्याने त्यावर अवलंबून असणारे मजूर, गवंडी, सुतार, ट्रक व्यावसायिक बांधकाम व्यावसायिक तसेच असंख्य मजूरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यात २१०० शासकिय व खाजगी बांधकामे सुरु असून ही बांधकामे रेतीविना संतगतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६)** :(१) मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गतीचे धोरण निश्चित करण्याचे विशद केले होते. त्यानुसार यासंबंधीचे धोरण दि. २१.५.२०१५ च्या शासन

निर्णयान्वये निश्चित करण्यात आले. सदर धोरणातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन, नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी रायगड जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये हातपाटीद्वारे रेती/वाळू उत्खन्नासाठी परवाने देण्यात आले आहेत.

(२) व (३) याबाबत कोणत्याही प्रकारची निवेदने अथवा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नोंदणी व मुद्रांक विभागाच्या लेखापरिक्षणात नोंदणी शुल्क किंवा स्टॅम्प डयुटी कमी आकारणे असे प्रकार घडल्याचे कॅगच्या अहवालात नमुद केले असल्याबाबत**

**(१६) २३७७२ (०६-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या उत्पन्न स्त्रोतापैकी दुसऱ्या क्रमांच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या लेखापरिक्षणात नोंदणी शुल्क किंवा स्टॅम्प डयुटी कमी आकारणे किंवा न आकारणे असे प्रकार घडल्याचे प्रकार कॅगच्या अहवालात नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा ६५२ प्रकरणांमध्ये राज्य शासनान १६२.९३ कोटी रुपयांचा तोटा झाल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, असे प्रकार पुन्हा घडू नये यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) तसेच हया नुकसानीस जबाबदार असणा-यावर शासन तातडीने काय कार्यवाही करणार आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अहवालानुसार आक्षेपांची संख्या ६५७ इतकी आढळून आली असून त्यातील आक्षेपित रक्कम रु.१०५.४२ कोटी इतकी आहे.

(३) नोंदणी व मुद्रांक विभागाकडून आक्षेपित दस्ताबाबत तसेच महसूल गळती रोखण्याच्या दृष्टीने सर्व विभागीय क्षेत्रिय अधिका-यांना मर्गदर्शनपर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. किल्ष्ट दस्तऐवज नोंदणीस आल्यास त्याची तपासणी नोंदणी उपमहानिरीक्षक किंवा सह जिल्हा निबंधक यांचेकडून करण्यात येऊन मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याची तात्काळ वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात कमी पडलेल्या मुद्रांक शुल्काची वसुली दंडासह करण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे दंडासह रक्कम वसुल करण्यात येते. ज्या प्रकरणात मोठा प्रमाणात महसूलाचे नुकसान झाल्याचे आढळून आल्यास त्या अधिका-यांविरुध्द निलंबनासारखी कारवाई करुन विभागीय चौकशी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यात गेल्या पाच वर्षापासून मंजूर असलेली रोहित्रांची कामे महावितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे रखडली असल्याबाबत**

**(१७) २३७९८ (१०-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यात गेल्या पाच वर्षापासून मंजूर असलेली रोहित्रांची कामे महावितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे रखडली असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांसह सामान्य जनतेला विजेच्या समस्येचा त्रास सहन करावा लागत असून दोनशेच्या वर गावे रोहित्रांअभावी अंधारात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जळालेल्या रोहित्रांची वाहतूक, लोडिक अनलोडिग व दुरुस्तीचा भुर्दंड शेतकऱ्यांवर न लावता तो महावितरणाने स्वत करावा अशी मागणी ग्रामस्थांसह लोकप्रतिनिधीनी एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही. २३५ अतिरीक्त रोहित्रे पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत मंजूर झाली असून त्याची कामे प्रगतीपथावर आहेत व स्पेशल पॅकेज अंतर्गत भोकरदन तालुक्यात १२० अतिरीक्त रोहित्र मंजूर आहेत व निविदेची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे आहे. भोकरदन तालुक्यातील कोणतेही गाव रोहित्राअभावी अंधारात नसून नादुरुस्त झालेली राहित्रे बदलून ती कार्यान्वित करण्यात आलेली आहेत.

(३) होय.

(४) महावितरण कंपनीच्या जालना मंडळ कार्यालयाने रोहित्राचे लोडींग अनलोडींगसाठी निविदा मागविल्या होत्या परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. नादुरुस्त रोहित्रे गाळणी शाखेत जमा करणे तसेच ने- आण करण्यासाठी वीज ग्राहकांना सांगण्यात येऊ नये व महावितरणच्या गाडीनेच ने-आण करण्यात यावी अशा सूचना कंपनीच्या मंडळ कार्यालयाने उपविभागीय कार्यालयास दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुमि अभिलेख कार्यालयात (जि.सोलापूर) एप्रिल २०१५ अखेर १८२७ प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) २३८२८ (०६-०८-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात एप्रिल २०१५ अखेर १८२७ प्रकरणे भुमि अभिलेख कार्यलयात प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुमी अभिलेख कार्यालयाकडे दाखल झालेल्या प्रकरणापैकी प्रकरण निकाली काढण्याचे प्रमाण फक्त १३.४६ टक्के एवढेच आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास अद्यापही सोलापूर जिल्ह्यास पुर्णवेळ भुमि अभिलेख अधिक्षक नाहीत हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सोलापूर जिल्ह्यामध्ये एप्रिल-२०१४ ते एप्रिल-२०१५ या कालावधीत ५५६३ मोजणी प्रकरणे प्राप्त झाली होती त्यापैकी याच कालावधीमध्ये उपलब्ध भूकरमापक व अन्य कर्मचारी यांच्या सेवांद्वारे ५२३३ मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

सोलापूर जिल्ह्यात एप्रिल-२०१४ ते एप्रिल-२०१५ या १३ महिन्यात प्राप्त मोजणी प्रकरणांपैकी निकाली काढलेल्या प्रकरणांची एकूण शेकडेवारी ९४.०६ टक्के एवढी आहे.
(३) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यात दि.०२/०६/२०१५ पासून जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख या पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत.
(४) व (५) सोलापूर जिल्ह्यात एप्रिल, २०१५ अखेर प्रलंबित असलेली १८२७ मोजणी प्रकरणे उपलब्ध भूकरमापक व अन्य कार्यालयीन कर्मचारी यांच्या सेवांचा वापर करुन निकाली काढण्यात आलेली आहेत.

---

## सांगली जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून तेरा हजार वीज ग्राहक वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१९) २३९३६ (०६-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून तेरा हजार वीज ग्राहक वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याचे केलेल्या एका पहाणीत माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये शेती, औद्योगिक, वाणिज्य आणि घरगुती ग्राहकांचा समावेश आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यात विजेच्या पायाभूत विकास आराखडयातील तब्बल ४४ कोटी रुपयांचा निधी वापराविना परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच तेरा हजार वीज ग्राहक वीज जोडण्यापासून वंचित रहाण्याची कारणे काय आहेत व उक्त ग्राहकांना तातडीने वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणत्या उपायोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. मागील तीन वर्षात (२०१२-१३, १३-१४, १४-१५) एकुण १,०३,०७९ नवीन ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली असून मे २०१५ अखेर २५,९११ इतके ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत. सन २०१५-१६ मध्ये ऑक्टोंबर, २०१५ अखेर ३,४७९ नवीन कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) नवीन वीज जोडण्या देण्यासाठी लागणारी यंत्रणा उभारण्याकरिता इन्फ्रा-२ व डीपीडीसी योजनेमध्ये अनुक्रमे ५६०३ व १०४५ इतक्या नवीन वीज जोडण्यांची कामे प्रस्तावित आहेत.

---

**पुणे जिल्यातील मावळ तहसिल कार्यालयाच्या लगत नागरीकांना बसण्यासाठी असलेले ब्रिटीशकालीन निवारा शेड धोकादायक असल्याबाबत**

**(२०) २४२५६ (०६-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील वडगाव मावळ तहसिल कार्यालयाच्या लगत नागरीकांना बसण्यासाठी असलेले ब्रिटीशकालीन निवारा शेड धोकादायक झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कामासाठी आलेल्या नागरीकांना विश्रांतीसाठी बसविण्यासाठी असलेल्या निवारा शेडची कौले फुटली असून कौलाखाली बसविलेले लोखंडी पत्रे गंजले आहेत, लाकडी कुजली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दुरावस्था झाल्यामुळे शेड जोरदार वाऱ्याने केव्हाही कोसळून अपघात होऊन नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, हे खरे आहे काय,
(४) असल्यास या, शेडची दुरुस्ती करणे बाबत महसूल विभागाच्या वतीने कार्यवाही करण्यात येणार आहे काय वा येत आहे,
(५) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :**(१), (२), (३) व (४) सदर शेड धोकादायक झाले होते, तथापि, तहसिलदार, मावळ यांच्या पत्रव्यवहारानुसार सदर शेडची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ शहरातील सार्वजनिक मोकळ्या जागेवर वाळू व्यावसायिक अवैधरित्या साठवण करत असल्याबाबत**

**(२१) २४५८६ (०८-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहराचा झपाट्याने विस्तार होत असून परिसरातील मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरु आहे. सदर कामाकरीता लागणारी वाळू ही शहरातील सार्वजनिक मोकळ्या जागेवर वाळू माफिया वाळूचे ढिगारे लावून अवैधरित्या साठवण करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ शहर परिसरातील वडगांव रोड गुरुकृपा नगरी, जांब रोड, आर्णी रोड, तलाव फैल, धामणगांव रोड यासह शहरातील विविध भागात दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैध रेती साठा व्यावसायिक माफीया एकाच टीपीवर चक्क पाच ते सहा वाळूच्या गाड्यांची वाहतुक करत असून यामुळे प्रशासनाला वाळूद्वारे मिळणा-या लाखो रुपयांची रॉयल्टीचा तोटाही प्रशासनाचा संबंधीत अधिका-यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६) :**(१) व (२) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गठित केलेल्या दक्षता पथकांनी केलेल्या तपासणीमध्ये यवतमाळ शहरालगत विविध ठिकाणी वाळूचे अवैध साठे निदर्शनास आले आहेत.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) प्रश्न भाग १ व २ च्या उत्तरामध्ये नमूद केलेले वाळूचे अवैध साठे जप्त करुन, संबंधितांविरुध्द फौजदारी गुंन्हे दाखल करण्यात आले आहेत, मात्र सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून मा.न्यायालयाने “जैसे थे” स्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर सह महाराष्ट्रभरातील शेती पंपासाठी ५ एच पी के कनेक्शन असणा-या शेतकऱ्यांना चक्क ७ एच पी चा लोड दाखवून जास्तीच्या बिलाची वसुली करण्यात येत असल्याबाबत**

**(२२) २४९३९ (०६-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर सह महाराष्ट्रातील तसेच जळगाव जिल्ह्यातील पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, अमळनेर, चोपडा, यावल, भुसावळ, जामनेर, मुक्ताई नगर, बोडवद, धरणगाव सर्व बहुसंख्य शेतक-यांना शेती पंपासाठी महावितरण कंपनीच्या अनियमित कारभारामुळे ३ एच.पी.चे. कनेक्शन असताना ५ एच.पी. आलेली वाढीव बिले दिली गेली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतक-यामध्ये प्रसरलेली नाराजीची भावना, त्यामध्ये दुष्काळाचे सावट असल्याने ५० पैसे च्या आणेवारी असताना आलेली वाढीव बिले यावर शासन काही कार्यवाही करणार आहे काय वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही. कृषी ग्राहकांच्या विद्युत पंप भार तपासणी मोहीमे दरम्यान प्रत्यक्षात असलेल्या पंपाच्या अश्वशक्ती भाराप्रमाणे संगणक प्रणालीमध्ये दुरुस्ती करुन वीज देयके आकारण्यात येतात.

(२) दिनांक १९.१२.२०१४ च्या शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त भागातील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, २०१४ या त्रैमासिक वीज बिलामध्ये संपूर्ण माफी देण्याचा सुधारीत निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने महावितरणतर्फे दुष्काळग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर,-२०१४ या त्रैमासिकाची वीज देयके संपूर्ण माफ करण्यात आलेली आहेत. तसेच २०१४-१५ च्या उर्वरित त्रैमासिक वीज बिलामध्ये शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५% सवलत देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुंबई (घोडपदेव) भू.क्र.७१८, माझगांव विभाग (घोडपदेव) चासकर चाळ, डी.पी.वाडी येथील जमिनीचा भाडेपट्टे करार संपुष्टात आल्याबाबत**

**(२३) २५१०१ (१०-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई (घोडपदेव) भू.क्र.७१८, माझगांव विभाग (घोडपदेव) चासकर चाळ, डी.पी.वाडी येथील जमिन ३१ मार्च, २०१२ रोजी संपुष्टात आलेल्या ९९ वर्षाचे भाडेपट्टे कराराच्या शर्तभंगाचे हस्तांतरीत करारनामे रद्द करुन भू.क्र.७१८ ही जमीन महसूल विभागाच्या ताब्यात घेण्याची मागणी श्री कुलस्वामी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) घोडपदेव, मुंबई-३३ यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल) मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचेकडे माहे एप्रिल, २०१५ वा त्या सुमारास लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडेपट्याने दिलेल्या जमिनीबाबत करारनामा तपासून जर करारनाम्यातील शर्तीचा भंग झाला असल्यास अशा जमिनी ताब्यात घेण्याचा धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर झाला आह, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त १ व २ प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६) :**(१) श्री.कुलस्वामी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांनी दि.८.१.२०१३ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल) यांचेकडे अर्ज केलेला आहे.

(२) नाही. शतर्ग भंगाच्या प्रकरणात प्रकरण परत्वे गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येतो.

(३) व (४) याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सुनावणी घेऊन शासनस्तरावरुन दि.१२.११.२०१३ रोजी आदेश पारित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात पुन्हा रिट याचिका दाखल करण्यात आलेली असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**८ तालुकयाची संबंधित कागदपत्रे रेकॉर्ड पूर्वीच्या ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातून नवीन पालघर जिल्हा मुख्यालयात हस्तांतरीत करण्याबाबत**

**(२४) २५१३३ (०६-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड, वाडा, मोखाडा अणि जव्हार या तालुक्यांचा समावेश असलेल्या नवीन पालघर जिल्ह्याची दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ८ तालुकयाची संबंधित कागदपत्रे रेकॉर्ड पूर्वीच्या ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातून नवीन पालघर जिल्हा मुख्यालयात हस्तांतरीत करण्याची कार्यवाही अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसल्याने दप्तरदिरंगाई होऊन उपरोक्त ८ तालुक्यातील जनतेची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील उपरोक्त ८ तालुक्यांची संबंधित कागदपत्रे, रेकॉर्ड पालघर जिल्ह्याच्या मुख्यालयाकडे तातडीने पाठविण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०२-२०१६) :**(१) होय.

(२),(३) व (४) दि.०१/०८/२०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्हा निर्माण झाला आहे. नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यात जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड, वसई, पालघर, डहाणू, तलासरी असे एकुण ८ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी ठाणे यांचे अधिपत्याखालील पालघर जिल्ह्यातील तालुक्यांशी संबंधित बहुतांश शाखांची कागदपत्रे जिल्हाधिकारी, पालघर यांना पाठविण्यात आली आहेत.

भूसंपादना संबंधी कागदपत्रे ही पालघर जिल्ह्याच्या संबंधित तालुक्याच्या उपविभागीय अधिकारी यांना हस्तांतरीत करण्यात आली आहेत. पालघर जिल्ह्यासाठी लिपिक संवर्ग वगळता उर्वरीत संवर्गाचे आस्थापनाविषयक कामकाज अद्याप जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडूनच होत असून अशा संवर्गाच्या आस्थापना दोन्ही जिल्ह्यांमध्ये विभागून देण्याविषयीची कार्यवाही विचाराधीन आहे.

---

**मौजे पेड (ता.तासगांव, जि.सांगली) तरुणाचा तुटलेल्या तारेतील वीज प्रवाहाचा धक्का बसून मृत्यु झाला असल्याबाबत**

**(२५) २५६६६ (१०-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पेड (ता.तासगांव, जि.सांगली) येथे प्रशांत शेंडगे या तरुणाचा तुटलेल्या तारेतील वीज प्रवाहाचा धक्का बसून मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, मिरज यांनी चौकशी केली आहे.
(३) विद्युत निरीक्षक, मिरज यांचा अहवाल व महवितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे व दाखले संबंधितांकडून प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे नुकसान भरपाई रक्कम प्राधान्याने मंजूर करण्यात येईल. तथापी संबंधितांच्या वारसांना महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे कंपनीकडून तातडीची मदत म्हणून रु.२०,०००/- दिनांक १२.५.२०१५ रोजी देण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शेळगाव (थडी) कुंडलवाडी (जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांनी कोटेशन भरुनही वीज वितरण कंपनी शेती पंपासाठी वीज जोडणी देण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(२६) २५९३२ (१०-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी येथील मौजे शेळगाव (थडी) येथील शेतकऱ्यांची कोटेशनची रक्कम भरुनही कुंडलवाडीचे वीज वितरण कंपनीचे शाखा उपअभियंता यांनी शेती पंपासाठी वीज जोडणी देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे शेतकऱ्यांनी सदर प्रकरणी आत्मदहनाचा इशारा दिला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांना शेती पंपासाठी वीज जोडणी त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) संबंधित शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी वीज जोडणी देण्यासाठी महावितरण कंपनी अंतर्गत धर्माबाद विभागीय पातळीवर सहा कोटी रुपयाच्या निविदा काढण्यात आल्या असून सदर कामे जेष्ठतायादीनुसार प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नांगरगाव, लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील रहिवाश्यांनी नाल्यात माती, दगड टाकून नैसर्गिक प्रवाह अडविल्याबाबत**

**(२७) २६०८५ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नांगरगाव, लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील रहिवाश्यांची त्यांच्या शेजारील असलेल्या मोकळ्या जमिनीवर व नैसर्गिक प्रवाहामध्ये माती, दगड टाकून बांधकाम करुन नैसर्गिक प्रवाह अडविल्यामुळे मार्च, २०१५ पासून ४-५ वेळा पडलेल्या पावसामुळे तेथील रहिवाश्याच्या घरात पाणी जाऊन फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबतची तक्रार तहसीलदार, लोणावळा, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी पुणे तसेच मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०७ एप्रिल, २०१५ रोजी लेखी तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नैसर्गिक नाल्याचा प्रवाह अडविल्यामुळे त्या ठिकाणी पाणी साठून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरुन मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरल्याबाबत तक्रारीत नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसारसंबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :**(१) व (२) होय. अशा आशयाची तक्रार करण्यात आली होती.

(३), (४) व (५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नगरपरिषदेने स्थळ पहाणी केली असता सदर ठिकाणी नाला बुजविल्याचे आढळून आले असून नाला पुर्ववता करणेची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी पावसाळ्यामध्ये पाण्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण झालेला नाही. वेळीच उपाययोजना करण्यात आल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. सदर परिसरात कोणतीही रोगराई  पसरल्याचेही निदर्शनास आले नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील दौंड व पुरंदर तालुक्यासाठी स्वतंत्र महसूल कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२८) २६०८७ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दौंड व पुरंदर तालुक्यासाठी स्वतंत्र महसूल कार्यालय सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री यांना मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दौंड व पुरंदर तालुक्यासाठी स्वतंत्र महसूल कार्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दौंड व पुरंदर तालुक्यासाठी स्वतंत्र महसूल कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) दौंड व पुरंदर तालुक्यासाठी स्वतंत्र कार्यालय सुरु करणार नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त आहे.
(२) व (३) शासनाच्या सर्वसाधारण धोरणानुसार दोन तालुक्यांसाठी एक उपविभाग यांप्रमाणे दौंड व पुरंदर या दोन तालुकयांसाठी दौंड-पुरंदर उपविभाग कार्यालय स्थापन करण्यात आले असून त्याचे मुख्यालय सासवड ता. पुरंदर येथे ठेवण्यात आले आहे. दौंड व पुरंदर तालुक्यांची भौगोलिक परिस्थिती विचारात घेता त्यासाठी एक उपविभागीय कार्यालय पुरेसे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील तलाठी कार्यालय भाड्याच्या जागेत असल्याबाबत

**(२९) २६४२६ (१०-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील तलाठी कार्यालयांना स्वतःची म्हणजे शासनाच्या मालकीच्या जागा नसून जिल्ह्यातील सुमारे ४८० तलाठी कार्यालये भाड्याच्या जागेत असल्याची बाब जून, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलाठी कार्यालयांना जागा उलपब्ध करुन देणा-या जागा मालकांचे भाड्यापोटी शासनाकडे तब्बल ६० लाख रुपये थकीत आहे, हे ही खर आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील एकूण ५२३ तलाठी कार्यालयापैकी केवळ ४३ कार्यालये मालकीच्या जागेत आहेत तसेच शासनाने केवळ १५० रुपये प्रतिमाह भाडे ठेवल्यामुळे एवढ्या कमी रकमेत जागा भाड्याने परवडत नसल्यामुळे अनेकांनी जागा न देण्याचा निर्णय घेतला आहे व त्यामुळे तलाठी कार्यालये वारंवार हलवण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कार्यालयाचे भाडे वाढवून मिळावे व नियमीत मिळावे, या मागणीसाठी तलाठी संघटनेने आंदोलन केली आहेत, परंतू शासनाने अदयापपर्यंत याबाबत निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) बुलढाणा जिल्ह्यातील ५३९ तलाठी कार्यालयांपैकी केवळ ४८ तलाठी कायालये शासकीय मालकीच्या जागेत कार्यरत असून ४९१ तलाठी कार्यालये ही भाडयाच्या जागेत आहेत सदर तलाठी कार्यालयांना जागा उपलब्ध करुन देणाऱ्या जागा मालकांचे भाड्यापोटी शासनाकडे जवळपास रुपये १ कोटी इतकी रक्कम थकीत आहे.

पूर्वी तलाठी कार्यालयाकरीता खाजगी जागेच्या भाड्यापोटी दरमहा रुपये १२५/- इतके भाडे मंजूर करण्यात येत असल्याने, एवढया रकमेत जागा मालकांना जागा भाड्याने देणे परवडत नसल्यामुळे अनेक तलाठ्यांना जागा भाड्याने मिळण्यासाठी अडचणी येत होत्या. तथापि, शासनाने दिनांक ५.६.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये तलाठी कार्यालयाच्या दरमहा भाड्यामध्ये दिनांक १.७.२०१३ पासून रुपये १२५/- वरुन वाढ करुन ग्रामीण भागासाठी रुपये १०००/- दरमहा व शहरी भागासाठी रुपये २०००/- दरमहा एवढे भाडे निश्चित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवापूर (ता.माण) येथील शेतकऱ्यांवर वाळू चोरीचा ठपका ठेवल्याबाबत**

**(३०) २७०४३ (१०-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवापूर (ता.माण) येथील शिरतावा ओढ्यालगत असलेल्या ५ एकर जमीनीतील वाळू चोरीचा ठपका शेतकऱ्यावर ठेवून साडे अठरा लाखांच्या वसुलीसाठी तालुक्यांच्या तहसीलदारांनी त्या जमीनेचे जप्तीचे आदेश काढले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्याच्या जमिनीचे जप्तीचे काडलेले आदेश
मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६) :**(१), (२) व (३) मौजे देवापूर, ता.माण येथील शिरतावा ओढ्यालगत गट नं.२७५ मध्ये एकूण ७४२ ब्रास वाळूचे अवैधरित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्याने, संबंधितांविरुध्द रु. १४,८४,०००/- इतक्या रकमेचे दंडाचे आदेश पारीत करण्यात आले. तथापि, संबंधितांनी दंडात्मक रकमेचा भरणा न केल्याने त्यांच्या मिळकतीच्या गाव नमुना नं. ७/१२ च्या इतर हक्कात बोजा ठेवण्यात आला आहे. संबंधितांनी सदर दंडाच्या आदेशाविरुध्द कोणत्याही न्यायालयात दादर मागितलेली नाही.

संबंधितांनी वाळूचे अवैध उत्खनन केले असल्याने दंडाचे आदेश मागे घेण्याचा व याप्रकरणी कोणतेही अधिकारी दोशी असल्याचे दिसून येत नसल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील महावितरणच्या मनमानी कारभाराबाबत**

**(३१) २७१३० (१०-०८-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांनी विद्युत पुरवठा मिळण्याकरीता अर्ज व मागणी पत्रकाचे पैसे भरल्यानंतरही शेतक-यांना विद्युत पुरवठा दिल्या जात नसल्याबाबतची तक्रार अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर २१ ते ३० दिवसाच्या आत बदलून दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ट्रान्सफॉर्मर मंजूरीची प्रक्रिया पारदर्शक दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच वीज मंडळातील अधिकारी यांनी एम.टी.लाईन उभारताना कंत्राटदार सर्व कामे शेतक-यांकडून करुन घेतली जातात, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच शेतकऱ्यांना विद्युत देयके बनावट व चुकीची दिली जाते व विद्युत देयके दुरुस्ती करण्याकरीता शेतकऱ्यांना नाहक त्रास दिल्या जातो, हे खरे आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) विदर्भ व मराठवाडा करीता विशेष निधी योजनेअंतर्गत शासनाने रु. ८१९ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. त्यापैकी उस्मानाबाद जिल्हयासाठी रु. ८६.०० कोटी निधी मंजूर झाला असून, त्यापैकी रु. २०.०० कोटीच्या निविदा काढलेल्या असून कृषीपंपाची वीज जोडणी काम ज्येष्ठता यादीनुसार काम चालू करण्यात आलेले आहे. तसेच रु. २५.५४ कोटीच्या कामाची निविदा प्रक्रिया सरु आहे.

(३) हे खरे नाही. ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर ट्रान्सफॉर्मरच्या उपलब्धतेनुसार व ज्येष्ठता यादीनुसार बदलून दिले जातात. सद्य:स्थितीत जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलून देण्याची संख्या निरंक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) हे खरे नाही.

(६) हे खरे नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथील सेतू कार्यालयातून प्रशासनाकडे स्वाक्षरीसाठी दाखल केलेले शेकडो जातीच्या दाखल्याचे प्रस्ताव पडून असल्याबाबत**

**(३२) २७४५६ (१०-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील सेतू कार्यालयातून प्रशासनाकडे स्वाक्षरीसाठी दाखल केलेले शेकडो जातीच्या दाखल्याचे प्रस्ताव पडून असल्याचे नुकतेच माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकताच १२ वी १० वी परिक्षेचा निकाल लागला असून प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची मोठी धावपळ सुरु असून पुढील शैक्षणिक प्रवेशांच्या कार्यवाहीसाठी जातीच्या दाखल्यांची नितांत आवश्यकता असतांनाही प्रस्ताव स्वाक्षरीअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाच्या कारभारविरोधात विद्यार्थी, पालकवर्गामध्ये प्रचंड संतापाचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने दाखल्याचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत अहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६)** :(१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील तळेवाडी (ता.कुडाळ) व मसूरे (ता.मालवण)**
**या गावात वीजेची सोय नसल्याबाबत**

**(३३) २७५०४ (१०-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील तळेवाडी (ता.कुडाळ) व मसूरे (ता.मालवण) या गावात वीजेची सोय नसल्यामुळे ग्रामस्थांनी संबधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी सदरहू गावात वीज नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यानुसार आढळून आले आहे हे खरे आहे,

(२) असल्यास, सदरहू गावात वीज देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही. सिंधुदूर्ग जिल्हयातील तळेवाडी (ता.कुडाळा) व मसूरे (ता.मालवण) या गावाचे विद्युतीकरण झाले असून गावात वीजेची सोय आहे. तळेवाडी ता.कुडाळ या गावात वीजपुरवठा केलेले १३० ग्राहक असून त्यांना एक रोहित्रामार्फत वीजपुरवठा सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी जॉली ब्रदर्स कंपनीला थकीत भाडेपट्टीची रक्कम शासनाकडे जमा करण्याबाबत आदेश दिल्याबाबत

**(३४) २८१६० (२६-१०-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांजूरमार्ग (ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर) सर्व्हे क्र.२७५, सी.टी.एस. क्र.६७५ अ, मधील ८० एकर जमिनीपैकी सुमारे १४ एकर जमिन जॉली ब्रदर्स कंपनीने निरनिराळ्या ४ ते ५ कंपन्यांना पोट भाड्याने दिल्या असून त्यापैकी १५ हजार ४६१.२३ चौ.मी. जमिन भाडेपट्ट्याने जॉली अनिल इंडिया या कंपनीला दिली असून शासनानेही १९८५/१९९९ मध्ये शासन आदेशान्वये या कंपनीला (जॉली अनिल इंडिया) भाडेपट्टेदार म्हणून मान्यता दिल्यानंतर आजमितीस सदर कंपनीने भाडेपट्टी शासनाकडे भरलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी सदर कंपनीला दिनांक २४ फेब्रुवारी, २०११ व तदनंतर पुन्हा दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस देवूनही शर्तभंगाबाबत कारवाई करण्याचे सुचित करुन रुपये १३ कोटी ९५ लाख ५६ हजार ७७५ इतकी थकीत रक्कम भाडेपट्टीची शासनाकडे जमा करण्याबाबत आदेश दिले असतांनाही महसूल मंत्र्यांनी सदरहू आदेशाला स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आदेशाला महसूल मंत्र्यांनी स्थगिती देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, महसूल मंत्र्यानी दिलेली स्थगिती विनाविलंब उठवून सदर जॉली अनिल इंडिया ही कंपनी १९९९ पासून जागेचा दिलेल्या उद्देशासाठी वापर करत नसल्याने तसेच शर्तभंग करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवित असल्याने शासनाने १९९९ पासून महसूलाची रक्कम दंडासहित वसूली करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही. प्रस्तुत प्रकरणी भाडेपट्टेदार कंपनी आजही जुन्या दराने येणारी भाडेपट्टा रक्कम भरणा करीत आहे.

(२) व (३) होय,

दावा मिळकतीबाबत भाडेपट्टा करारनामा आणि दि.१२/१२/२०१२ रोजीचे शासन निर्णयाच्या अनुषंगाने या प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या आक्षेपित निर्णयाची तपासणी करणे आवश्यक ठरते. दरम्याच्या काळात पुढील कायदेशीर गुंतागुंत होऊ नये, यास्तव कंपनीच्या विनंतीवरुन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दि.४/९/२०१४ रोजीच्या आदेशात तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दि.१२/९/२०१४ रोजीच्या आदेशान्वे स्थगिती दिली आहे.

(४) सर्व संबंधिताना सुनावणी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड मुंबई येथील सर्व्हे नं. २४३ व २४६ या आदिवासींच्या जमिनीवर बिगर आदिवासीने बाधलेल्या इमारतीकडे प्रशासनाने केलेले दुर्लक्ष**

**(३५) २८२०६ (२६-१०-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड मुंबई येथील सर्व्हे नं.२४३ व २४६ या आदिवासींच्या जमिनीवर बिगर आदिवासी यांनी इमारत बाधली असून या इमारतीकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याबाबत तेथील आदिवासींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माजी लोकप्रतिनिधी विवेक पंडित यांनी दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिगर आदिवासी खातेदारांची नावे ७/१२ मध्ये नसताना मालमत्ता पत्रकात लावली आणि त्या जागेवर इमारती उभ्या राहिल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीचे व्यवहार करणारे तसेच विकासक व शासकीय अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करुन आदिवासीना जमिनीचा कब्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे-मुलुंड ता.कुर्ला येथील सर्व्हे नं. २४३/३ व २४६ च्या सातबारा मध्ये कब्जेदार सदरी बारक्या हाल्या वारली व अर्जुन हाल्या वारली या आदिवासींची नावे दाखल आहेत. सदर मिळकतीचे नगर भूमापन क्रमांक २४ब/१ आणि २४ब/३ ते ५ असे आहेत.

सदर जमिनीच्या मिळकत पत्रिकेत दिनांक २८/२/१९८५ रोजी अरविंद नगर अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि. असे नाव दाखल झाले होते. सदर नाव मा.मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक १०४२/१९८४ मध्ये दिनांक ११/७/१९८४ रोजी झालेल्या कन्सेंट टर्मस् नुसार दाखल केल्याचे दिसते.

तदनुसार जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख मुंबई उपनगर जिल्हा यांच्या दि. १९/९/२०१४ च्या पुनर्विलोकन आदेशान्वये फेरफार क्रमांक १३७५ दिनांक ५/१/२०१५ पुनर्विलोकनात घेऊन अरविंद नगर अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि. हे नाव कमी करुन सातबारा प्रमाणे बारक्या हाल्या वारली व अर्जुन हाल्या वारली यांची नावे न.भू.क्र. २४ब/१ व २४ब/३ ते ५ च्या मिळकत पत्रिकेस दाखल केली आहेत. या ठिकाणी ३ ते ४ मजल्यांच्या एकूण ५ इमारती असून सुमारे ३० ते ४० चाळ स्वरुपाची बैठी घरे आहेत.

न.भू.क्र.२४ब/२ च्या मिळकत पत्रिकेस दिनांक १८.६.१९९९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नाव दाखल झाले असून सदर मिळकतीवर सध्या रस्ता आहे.

(३) प्रकरणी कोणतीही गुन्हा दाखल झालेला नसून सध्याच्या गाव नं.७/१२ व मिळकत पत्रिकेस बारक्या हाल्या वारली व अर्जुन हाल्या वारली या आदिवासींची नावे दाखल आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**दौंड पुणे शहरातील सत्ता प्रकार ब या मिळकतीस मुदतवाढ व सारा ठरवणेबाबत**

**(३६) २८२४८ (२६-१०-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड पुणे शहरातील सत्ता प्रकार ब या मिळकतीस मुदतवाढ व सारा ठरवणेबाबत स्थानिक वि.स.स. यांनी मा.महसूल, मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २०१५ व दिनांक ०२ मार्च, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ता.दौंड (जि.पुणे) शहरातील सत्ता प्रकार ब या मिळकतीस मुदतवाढ देण्याबाबत व सारा ठरवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास या शहरातील सत्ता प्रकार ब या मिळकतीस मुदतवाढ देणे वा सारा ठरविल्यास त्याचा किती नागरिकांना फायदा होणार आहे,

(४)असल्यास उक्त निवेदनावर निर्णय घेण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :**(१) होय.

(२), (३) व (४) राज्यात बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर भागातील शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे धोरण निश्चित करण्याकामी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबत अभ्यास समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(३७) २८३६० (०८-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्यावतीने स्थापन केलेली बेदखल कुळ अभ्यास समितीने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कोकणचा दौरा करून कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबतचा अहवाल शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सादर केलेल्या अहवालावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :**(१) कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.०९.२०१४ रोजी अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. सदर अभ्यास समितीचा अहवाल शासनास प्राप्त व्हावयाचा आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील संभाजीनगर, शिर्डी, ठाणे व नागपूरमधील**
**तीर्थक्षेत्राच्या सोलार सिटी आराखड्याबाबत**

**(३८) २८९८२ (२६-१२-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संभाजीनगर, शिर्डी, ठाणे व नागपूर मधील तीर्थक्षेत्रासाठी सोलार सिटी आराखड्याला केंद्र शासनाने पारंपारिक उर्जा मंत्रालयाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृती आराखड्यानुसार किती कालावधीत काम पूर्ण करण्यात येणार आहे व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) अद्याप सोलार सिटीचे काम सुरु झाले नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०१-२०१६) :**(१) होय.

सोलर सिटी ही योजना केंद्र शासनाची असून राज्यातील औरंगाबाद, शिर्डी, ठाणे व नागपूर इ. शहरांना नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने सोलर सिटी कार्यक्रमांतर्गत मंजुरी प्रदान केली आहे.

(२) क्रेद शासनाच्या नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्रालयाच्या ध्येय धोरणांतर्गत कृती आराखड्यामध्ये कालावधी नमूद केलेला नाही. सौर शहरीकरण योजना राबविण्यासाठी केंद्र शासनामार्फत करण्यात आलेली निधीची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शहरांची नावे | निधीची तरतूद (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ५०.०० |
| २ | शिर्डी | ४३.४८ |
| ३ | ठाणे | ४९.८४ |
| ४ | नागपूर | ४८.९३ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी रिक्त असलेल्या तलाठी पदाबाबत**

**(३९) २९०९९ (०८-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये १४२ महसुली गावे, २५० वाड्या, १०३ धनगरवाडे व मध्यपूर्व भाग वगळता दळण वळणाचाही अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास १४२ महसुली गावे व त्यांना जोडणाऱ्या वाड्याचा कार्यभार फक्त २९ तलाठ्यांवर सुरु आहे, त्यामुळे एका तलाठ्यास २ ते ३ गावांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास त्यामुळे शेतकऱ्यांना लागणारे ७-१२ व ८अ उतारे तसेच इतर दाखले मिळण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी व सदरची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६)** :(१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा या उप विभागीय कार्यालयातंर्गत येणाऱ्या शाहुवाडी तालुक्यामध्ये एकूण १४२ महसूल गावे असून त्यांना सलग्न धनगरवाडे व वाड्यावस्त्या आहेत. शाहुवाडी तालुक्यामध्ये एकूण ३९ सजांसाठी तलाठ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी ३० सजांवर तलाठी पदे कार्यरत आहेत. उर्वरित ९ तलाठी पदे विविध कारणांनी रिक्त आहेत व एक तलाठ्यांची सेवा पुनर्वसन कार्यालय, कोल्हापूर येथे वर्ग आहे. त्यामुळे एकूण १० तलाठ्यांकडे मूळ संजासह अतिरिक्त सजाचा अतिरिक्त पदभार असल्याचे दिसून येते. तथापि शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विस्तारित समाधान योजनेसारखे उपक्रम तहसिल स्तरावर घेऊन मुदतीत कामकाज करण्याची दक्षता घेतली जात आहे. सदर तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता तलाठी भरती प्रक्रीया पार पाडलेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तहसील कार्यालय खामगाव (जि.बुलडाणा) अंतर्गत असलेल्या तलाठींची रिक्त पदे भरणेबाबत**

**(४०) २९१५७ (२३-१२-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तहसिल कार्यालय खामगाव (जि.बुलडाणा) अंतर्गत किती तलाठ्यांची पदे रिक्त आहेत,
(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका तलाठ्याला २-२ गावाचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एका तलाठ्याला अतिरिक्त प्रभार दिल्यामुळे त्यांच्या मुळ गावातील कामे प्रलंबित राहात असून शेतकऱ्यांना हवे असलेले विविध दाखले मिळण्या पासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, तलाठ्याच्या परिक्षा पूर्ण होऊन सुद्धा त्यांना अदयापर्यत नियुक्त्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६)** :(१), (२), (३), (४) व (५) तहसिल कार्यालय खामगांव अंतर्गत एकूण ६२ तलाठी साजे असून ५९ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत.

सन २०१४-१५ मध्ये ६ व सन २०१५-१६ मध्ये २ अशा एकूण ८ तलाठ्यांची पदे भरण्यात आली आहे. सदर ८ नवनियुक्त तलाठ्याना साजावर नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि, प्रशिक्षण धोरणानुसार सदर नवनियुक्त तलाठ्यांचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे रिक्त असलेल्या पदांचा प्रभार तात्पुरत्या स्वरुपात नजिकच्या साज्याच्या तलाठ्यांकडे सोपविण्यात आला असून त्यांचे मूळ साजातील कामाबरोबरच अतिरिक्त एका साजाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना अतिरिक्त कार्यभार दिलेल्या तलाठ्यास देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरुर अनंतपाळ (ता.निलंगा, जि.लातूर) येथील ४० एकर जमिनीवर ४० कोटीच्या काढलेल्या कर्जाबाबत**

**(४१) ३०२४१ (२३-१२-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर-अनंतपाळ (ता.निलंगा, जि.लातूर) येथील ३९ एकर जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्यात फेरफार करुन एकच जमिन तीन बँकाकडे गहाण ठेवून तब्बल ४० कोटीचे कर्ज घेवून अफरातफर केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :**(१), (२) व (३) मे.व्हीक्टोरिया ॲग्रो फुडर्स प्रा.लि. व इतर ८ संचालकांनी कंपनीच्या व्यवसायासाठी युनियन बँक ऑफ इंडिया कडून या रु. ४० कोटी इतके कर्ज, कर्जदारांच्या मौजे साकोळ, ता.निलंगा येथील जमीन तारण ठेवून घेतले होते. सदर कंपनी व संचालकांनी कर्जाची परतफेड केली नाही. म्हणून युनियन बँक ऑफ इंडिया यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांचे कार्यालयात सिक्यूरीटीरायझेशन ॲन्ड रिकन्र्स्टक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोसेमेंट सेक्युरिटी इंटरनेस्ट टॅक्ट २००२ चे कलम १४ अंतर्गत तारण जमिनीचा ताबा मिळवून देण्यासाठी अपील प्रकरण दाखल केले आहे. सदर अधिनियमांतर्गत जिल्हादंडाधिकारी यांचे अधिकार उपविभागीय दंडाधिकारी यांना प्रदान केले असल्याचे सदर अपीलप्रकरणी उपविभागीय दंडाधिकारी, निलंगा यांच्या स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शासनाच्या सौर कृषीपंप वितरणाची महत्वाकांक्षी योजनेला १०० टक्के अनुदान देण्याबाबत**

**(४२) ३०२६२ (२३-१२-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाची सौर कृषीपंप वितरणाची महत्वाकांक्षी योजना यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात लागू करण्यात आली असून त्यासाठी शेतकऱ्याकडून एकूण खर्चाच्या ५ टक्के रक्कम घेण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांकडून ही ५ टक्के रक्कम न घेता १०० टक्के अनुदानावर सौर कृषीपंप शेतकऱ्यांना देण्यात यावी त्याचबरोबर धडक सिंचनातील विहिरींची खोली वाढवावी अशी मागणी शेतकरी बचाओ आंदोलन समितीतर्फे जिल्हाधिकारी व महावितरणाचे अधिक्षक अभियंता यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने विचारविनिमय करुन उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. (शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७, दिनांक २७ मार्च, २०१५ नुसार)

(२) मा. जिल्हाधिकरी, यवतमाळ यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) प्रचलित शासन निर्णयानुसार कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील कुर्ला, वरळी व गोरेगाव येथील एकमेव शासकीय आरे दूध डेअरी बंद करुन खाजगीकरणाचा निर्णय घेण्यात आल्याबाबत**

**(४३) ३०३१९ (०८-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुर्ला, वरळी व गोरेगाव येथील एकमेव शासकीय आरे दूध डेअरी बंद पडून खाजगी करणाचा निर्णय घेण्यात आल्यामुळे या दुग्ध शाळेत तयार होणारी सर्व उत्पादने बंद करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या दुग्ध शाळेतून तयार होणा-या उत्पादनांन मोठ्या प्रमाणात मोठी मागणी असल्याने पुर्ववत उत्पादने तयार करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करयात येत आहे,
(४) असल्यास याबाबत अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उदगीर येथील पशु, मत्स व दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(४४) ३१५०९ (०८-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर येथील पशु, मत्स व दुग्ध तंत्रज्ञान या तीन महाविद्यालयातील पशु पैदास क्षेत्र व पशु विद्यापीठ उपकेंद्रातील मंजूर पदे अद्याप भरण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०२-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) उदगीर येथील पशुपैदास प्रक्षेत्रावर २९ पदे व विद्यापीठाच्या उपकेंद्रात १७ पदे अशी एकूण ४६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी पशुपैदास प्रक्षेत्र व अंतर्गत ११ पदे व विद्यापीठ उपकेंद्राअंतर्गत ८ पदे अशी एकूण १९ पदे भरलेली आहेत. पशु पैदास प्रक्षेत्र व विद्यापीठ उपकेंद्र येथे अनुक्रमे १८ व ९ अशी एकूण २७ रिक्त पदे असून सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.
(३) वरीलप्रमाणे पदभरतीबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

### कोल्हापूर जिल्हयात विशेषत: चंदगड तालुक्यात पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

**(४५) ३२५५७ (२३-१२-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात विशेषत: चंदगड तालुक्यात पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती अभावी अर्धी पदे रिक्त असल्याने, पशुधन यांना पुरेशा प्रमाणात आरोग्य सेवा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोल्हापूर जिल्ह्यात रिक्त असलेली पशुवैदयकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही.
चंदगड तालुक्यामध्ये पशुधन विकास अधिकारी यांची ६ पदे मंजूर असून त्यापैकी ३ पदे भरलेली आहेत. तसेच पशुधन पर्यवक्षकांची ६ पदे मंजूर अनूसन ५ पदे भरलेली आहेत व त्यांचे मार्फत पशुपालकांच्या पशुधनास पशुवैकीय अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिलोली तालुक्यातील (जि.नांदेड) डोनगांव बु. व कुंडलवाडी येथील तलाठ्याने गायरान जमिनीमधील चुकीचा पेरा, चुकीचे फेरफार व ७/१२ वरील नोंदी केल्याबाबत**

**(४६) ३४५८३ (०८-०१-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली तालुक्यातील (जि.नांदेड) डोनगांव बु. व कुंडलवाडी येथील तलाठ्याने गायरान जमिनीमधील चुकीचा पेरा, चुकीचे फेरफार व ७/१२ वरील नोंदी केल्या असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तलाठ्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६)** :(१) डोनगांव बु. व कुंडलवाडी, ता. बिलोली गावातील गायरान व सरकारी जमीनीबाबत अभिलेख तपासले असता चुकीचे फेरफार किंवा नोंदी झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज तालुक्यात (जि.बीड) जवळपास दीड लाख पशुधन असतांनाही पशुचिकित्सालय बंद ठेवण्यात आल्याबाबत**

**(४७) ३६९२१ (२३-१२-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज तालुक्यात (जि.बीड) जवळपास दीड लाख पशुधन असतांनाही केवळ दुर्लक्षामुळे गेल्या अनेक दिवसांपासून पशुचिकित्सालय बंद ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर पशुचिकित्यालयाची इमारतीत पशुचिकित्सेसाठी सोनोग्राफी मशीन, एक्स रे मशीन इतर यंत्र सामुग्रीही आणली असून ही यंत्रणा धूळखात पडली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुधनांना योग्य उपचार मिळावेत यासाठी सदर पशुचिकित्सालयात सहाय्यक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी, लिपिक, ड्रेसर, शिपाई या सर्व रिक्त जागांवर नियुक्ती करुन चिकित्सालय सुरु करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यावाही करण्यात येणार आहे वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर चिकित्सालयास सोनोग्राफी मशीन, एक्स-रे मशीन इतर मोठया यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्यात आलेला नाही. संस्थेत उपलब्ध असलेल्या इतर साहित्य व सामुग्रीचा वापर पशुरुग्णांचे उपचारासाठी करण्यात येतो.

(३) पशुधन विकास अधिकारी व ड्रेसर ही पदे भरली आहेत. उर्वरीत पदे भरणेबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यातील गायरान जमिनी शेतकऱ्यांच्या नावाची नोंद सातबारा सदरी करण्याबाबत**

**(४८) ३८९०७ (२२-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यांतील सन १९९५ नंतर ज्या शेतकऱ्यांनी गायरान जमिनीवर अतिक्रमण केले आहे, त्या शेतकऱ्यांच्या नावांची नोंद सातबारा सदरी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यांत अशी किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणांचा निपटारा जलद गतीने होण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६)** :(१) शासन निर्णय क्र. एलइएन-१०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ चा विचार करता आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यातील गायरान जमिनीवरील सन १९९५ नंतरची अतिक्रमण नियमित करण्यास पात्र ठरत नसल्याने, त्या शेतकऱ्यांचे अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजुर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कामात होणाऱ्या विलंबाबाबत

**(४९) ३९३७७ (११-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यास सन २००७ साली मंजूरी मिळाली असतांनाही दवाखान्याचे काम अद्यापर्यंत सुरु झालेले नाही हे खरे आहे काय

(२) असल्यास, राजूर येथे पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत बांधकामासाठी जालना जिल्हा वार्षिक योजनेत निधीची तरतूद करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पशुवैद्यकीय दवाखाना तातडीने उभारणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

---

## गंगाखेड (जि.परभणी) येथील मंजुर सौरउर्जा प्रकल्पाच्या विलंबाबाबत

**(५०) ३९५७८ (१३-०१-२०१६). श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील पोखर्णी (वा), डोंगरगांव, खादगांव या शिवारातील २०५ हेक्टर जमीन सौरउर्जा प्रकल्पा करीता संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास महावितरणच्या वरीष्ठ अधिकारी यांनी सदरील जागेची पाहणी करून १००० मेगाव्हॅट विज सौरउर्जा प्रकल्पाव्दारे निर्माण करता येऊ शकते असा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सादर केलेला अहवाल तपासुन शासनाने सन २०१३ साली या प्रकल्पास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मंजुरीनुसार हा प्रकल्प केव्हा उभारण्यात येणार आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) ते (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.